# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Centre for Study of Social Exclusion and Inclusive Policy

### ADMISSION NOTICE 2023-2024

1. **Course Name** : P.G. Diploma in Social Exclusion and Inclusive Policy
2. **Eligibility** : Graduation from the statuory University.
3. **Intake** : 30
4. **Admission** : Candidates fulfilling eligibility norms i.e. graduation from the statuory University.
5. **Online Application Dates** : From 28/03/2023 onwards
6. **Online Application Fee** : Rs. 200/- Per Programme
7. **Online Application Link :** https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information

For Further details please contact

**Director**
Centre for Study of Social Exclusion and Inclusive Policy,
Fist Floor,Shahu Research Center Building,
Shivaji University, Kolhapur
Phone: 0231 – 2609399,
Email : csseip@unishivaji.ac.in

Place: Kolhapur
Date:

**Dr. V. N. Shinde**
Ag. Registrar

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## सामाजिक वंचितता व समावेश धोरण अभ्यास केंद्र

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## ''सामाजिक वंचितता व समावेशक धोरण पदव्युत्तर पदविका''
## (P. G. Diploma in Social Exclusion and Inclusive Policy)

समाजातील जात, वंश, धर्म, लिंग इत्यादी ओळखींच्या आधारे मुख्यप्रवाहापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आलेल्या वंचित समाज घटकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रगती व समावेशन याबाबत अभ्यास व संशोधन यातून 'सामाजिक वंचितता व समावेशन' (Social Exclusion Inclusion) ही संकल्पना अस्तित्वात आलेली आहे. भारतामध्ये याबाबतच अभ्यास सुरू व्हावा यादृष्टिने भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालय व विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी देशभरामध्ये एकूण ३५ शैक्षणिक संस्थांमध्ये सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राची (Center for Social Exclusion and Inclusive Policy) निर्मिती केलेली आहे. या केंद्राने समाजातील दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती-जमाती, मुस्लीम, ख्रिश्चन, स्त्रीया, देवदासी, वाघ्या-मुरळी, अपंग, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, लैंगिक अल्पसंख्याक, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी ज्वलंत सामाजिक विषयावर शैक्षणिक, संशोधन इत्यादी उपक्रम राबविले आहेत.

**अभ्यासक्रमाविषयी**

समाजातील वंचित समाज घटकांच्या मागासलेपणाची कारणमीमांसा करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनपातळीवर झालेले कार्य व शासनाची भूमिका, वंचित घटकांच्या सामाजिक उत्थानासाठी निर्माण झालेल्या चळवळी, सामाजिक व आर्थिक सुधारणा, सुधारक व विचारवंत यांचे कार्य आणि विचार, वंचितांचे अधिकार आणि पर्यावरण, कामगार व कामगार संघटना, कामगार कायदे व त्यांचे हक्क इत्यादीबाबत या अभ्यासक्रमामध्ये सविस्तरपणे अभ्यास केला जातो. या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना वर्षभरामध्ये एकूण ५ विषय अभ्यासावे लागतात तर एक लघुसंशोधन प्रकल्प सादर करावा लागतो.

**अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये**

मानव्यविद्या शाखेसह इतर विद्याशाखेतील विद्यार्थी व संशोधक तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना भारतातील सामाजिक वंचिततेची प्रक्रिया व कारणमीमांसा, वंचित समूहांचे समावेशन आणि त्याबाबतची शासनाची भूमिका व कार्ये, वंचित समाज घटकांच्या न्याय हक्कांसाठी देशात झालेल्या सामजिक चळवळी इत्यादी बाबी समजून घेण्यास अत्यंत महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम. इतर अभ्यासक्रमाबरोबर हा अभ्यासक्रम एकाचवेळी पूर्ण करता येतो.

**नोकरीच्या संधी** – सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत शासकीय व बिगर शासकीय संस्थांमध्ये नोकरीच्या संधी व काम करण्यासाठी उपयुक्त अभ्यासक्रम.

**प्रवेश पात्रता** – कोणत्याही विद्याशाखेतील पदवी.

स्थलांतर दाखला (T.C.) आवश्यकता नाही.

**प्रवेश क्षमता** – एकूण प्रवेश क्षमता ३० जागा.

**शुल्क** – रुपये- ३०४०/-

**अभ्यासक्रम कालवधी**-- एक वर्ष.

**संपर्क**

**प्रा. अविनाश भाले किंवा डॉ. किशोर खिलारे**

सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र,

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर- ४१६००४

फोन नंबर- ०२३१- २६०९३९९